
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

● वर्ष : ९० ● मार्च २०२२ ● पुरवणी विशेषांक ०५





इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE ★
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

४१ **स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यिक प्रगती**
- डॉ.प्रवीणा नागपूरकर, नागपूर ---------------------------------------- १७३

४२ **लातूर जिल्हापरिषदेतील ओबीसींचा राजकीय विकास व आधुनिकीकरणाचे विश्लेषण (१९९२-२०१२)**
- १) डॉ. राहुल बावगे, नागपूर, २) डॉ.असीम खापरे, पुसद ------------------- १७६

४३ **भारतीय स्वातंत्र्य चळवळी संदर्भात जातीच्या प्रश्नाची डॉ.आंबेडकर कृत चिकित्सा**
- डॉ.राहुल गोंगे, नारायणगाव, जि.पुणे ----------------------------------- १७९

४४ **कोरोना विषाणूचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम**
- डॉ.रागेश बहुरूपी, भिवापूर ------------------------------------- १८२

४५ **आदिवासी जमातींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान** - डॉ.राजू पवार, शिरपूर, जि.धुळे. - १८५

४६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीयांचे योगदान** - डॉ. राजू जाधवर, कळंबोली, नवी मुंबई---- १८८

४७ **भारतीय संविधान निर्मिती आणि विकास** - १)डॉ.रायन महाजन, नागपूर, २) डॉ.संदीप तुंदूरवार, नागपूर, ३) डॉ.शरद सांबारे, नागपूर, ४) डॉ.राहुल चुटे, मुरमाडी---------------------- १९०

४८ **हरितक्रांती व त्याचे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेले परिणाम**
- १)डॉ. सचिन भोगेकर, नागपूर, २) डॉ.नितीन कायरकर, नागपूर. ---------------- १९४

४९ **आधुनिक भारताच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान**
- डॉ. संजय ढवळे, मोहपा, जि.नागपूर ---------------------------------- १९८

५० **ग्रामीण क्षेत्रात नागरी आधारभूत सुविधांची तरतूद योजनेचा संक्षिप्त आढावा**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, -------------------- २०२

५१ **भारतीय दुग्ध उद्योगाची कामगिरी**
- डॉ.एस.बी.महाजन, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ---------------------- २०७

५२ **महाराष्ट्रातील कृषी विषयक विकासात वसंतराव नाईक यांचे योगदान**
- डॉ.सतिष राठोड, नागपूर. -------------------------------------- २१४

५३ **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यांमधून दिसणारी समाज सुधारणाविषयक भुमिका : एक चिंतन** *
- डॉ.शिल्पा शेटे, पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे ---------------------------- २१७

५४ **१९४२ ची चले जाव चळवळ व पहिला झेंडा वंदन** - डॉ.श्रीकांत सोनटक्के, नागपूर, ------ २२४

५५ **राष्ट्रीय काँग्रेसच्या आरंभीच्या राजकारणात न्या. म. गो. रानडे यांची भूमिका**
- डॉ. श्रीनिवास सातभाई, अमरावती. ---------------------------------- २२८

५६ **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान**
- १)डॉ.सोनिया डावरे, औरंगाबाद २)डॉ.शीला स्वामी, उस्मानाबाद---------------- २३३

५७ **नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील परिवर्तन** - डॉ.सोनू लांडे, पनवेल, जि.रायगड ---------- २३७

५८ **वैश्विक स्त्रीवादाचे स्वरूप, भूमिका व वाटचाल** - डॉ. सुधाकर चौधरी, शिरपूर, जि.धुळे. --- २४१

५९ **छत्रपती शिवाजी महाराज यांचे जलव्यस्थापन**
- १)डॉ.सुजाता गौरखेडे, नागपूर, २)डॉ.सचिन बन्सोड, नागपूर ----------------- २४४

६० **बहिष्कृत हितकारिणी सभा : अस्पृश्य समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणणारी संस्था**
- डॉ.सूर्यकांत कापशीकर, नागपूर --------------------------------------- २५०




SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

ISSN No. 2394-5990

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्यांमधून दिसणारी समाज सुधारणाविषयक भुमिका : एक चिंतन

**प्रा. डॉ. शिल्पा शेटे**
**श्री पद्ममणि जैन कला व वाणिज्य महाविद्यालय, पाबळ, ता. शिरूर, जि. पुणे.**

**प्रस्तावना :**

सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या बरोबरीने स्वतःला समाजसेवेमध्ये गुंतवून घेतले होते. आणि आयुष्यभर त्यांनी स्त्री, शूद्र, अतिशूद्र यांचा उद्धार करण्याचा, त्यांना ज्ञानप्राप्ती करून देण्याचा, त्यांना सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले यांना म.फुले यांनी शिक्षण दिले आणि त्यांनी पुण्यात स्थापन केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळमध्ये पहिल्या महिला शिक्षक व पहिल्या महिला मुख्याध्यापक म्हणून काम केले, हे तर सर्वश्रुतच आहे.

सावित्रीबाईंचे विचार हे केवळ पतीने सांगावे व ते आपण त्यांचे आचरण करावे एवढ्यापुरतेच मर्यादीत नव्हते. तर त्यांनी स्वतंत्र वृत्तीने कार्य केले. ज्याप्रमाणे त्यांनी समाजकार्यात स्वतःला झोकून दिले, त्याचप्रमाणे स्वतः अनेक प्रकारचे लेखनही केले. म. फुले यांच्याप्रमाणे त्याही प्रतिभावान होत्या, हे त्यांच्या लेखन केलेल्या साहित्यावरून दिसते. त्यांनी 'काव्यफुले' नावाचा काव्यसंग्रह १८५४ साली लिहीला. त्याचप्रमाणे 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हाही दुसरा काव्यसंग्रह १८९१ साली लिहिला. त्याचप्रमाणे त्यांनी 'म. फुले यांना लिहिलेली पत्रे', 'सावित्रीबाईंनी जोतिबांना लिहिलेली पत्रे', 'मातुश्री सावित्रीबाईंची पत्रे व गाणी', ज्यातील गाणी आता उपलब्ध नाहीत. 'शिव महिम्नसोत्र', 'ग्रहलाघव', 'म्हणीविषयी चार शब्द', 'शुकबहात्तरी', 'हिंदुस्थानचा इतिहास', 'नितीशतक', 'अथ सांगरुद्र प्रारंभ', 'भूगोलपत्रक', 'शालापत्रक', 'सिंहासनबत्तीशी', 'गद्य रत्नमाला', 'इसापनीती', 'साक्रेतीसचे चरित्र' इ. लेखन त्यांनी केले आहे. याशिवाय 'जोतीबांची भाषणे' त्यांनी संपादित केली आहेत. त्यांचे समग्र साहित्य 'सावित्रीबाई फुले-समग्र वाङ्मय' या पुस्तकात प्रकाशित झाले आहे. ते डॉ. मा. गो. माळी यांनी संपादित केले आहे. हे पुस्तक आकाराने लहान असले तरी त्यामधून सावित्रीबाई फुले यांची कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय परिणामकारक मांडण्याची शैली दिसते. परिशिष्टांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या मोडी लिपीतील हस्ताक्षरातील काही कविता व इतर लेखन दिले आहे. प्रस्तुत लेखात संशोधकाने 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांनी लिहिलेल्या केवळ 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कवितांचे सामाजिक व ऐतिहासिक दृष्टीकोनातून विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यामध्ये विविध आशयाच्या कविता दिसतात. या संग्रहात एकूण ४१ कविता समाविष्ट आहेत. निसर्गविषयक, सामाजिक, प्रार्थनापर, आत्मपर, काव्यविषयक, बोधपर आणि इतिहासविषयक आणि स्फुट कविता यांचा समावेश होतो. या कवितांचे विषय जरी विभिन्न स्वरूपाचे असले, तरी त्यांमधून सामाजिक आशय ठळकपणे दिसतो. तत्कालीन समाजामध्ये दिसणारी असमानता, रानटी वृत्ती, भेदाभेद, पूर्वीच्या समाजात असणाऱ्या खोट्या, खुळचट कल्पना, बहुजनांना नाकारलेली शिक्षणाची संधी व इंग्रजी राजवटीत ती संधी मिळूनही शिक्षणाविषयी त्यांची असणारी उदासीनता, मनुस्मृतीने स्त्रिया व शुद्रातीशूद्रांना नाकारलेल्या अनेक संधी व त्यांना गुलामगिरीत खितपत ठेवल्यामुळे त्या ग्रंथांविषयी व व्यवस्थेविषयी निर्माण झालेली कटुता, धार्मिक रीतीरिवाज, स्त्रीप्रश्न, सतत काम करत (उद्योगशील असण्याचे महत्त्व), तसेच आळशी मनोवृत्तीवर केलेला प्रहार यांसारख्या व्यापक पातळीवर विषय आलेले आहेत. त्यांच्या कवितांमधून अतिशय मोजक्या मात्र मार्मिक शब्दांत तत्कालीन सामाजिक व धार्मिक चालीरीतींवर जळजळीत प्रकाश तर पडतोच, पण त्याचबरोबर त्या दूर करण्याचे उपायही त्या अगदी सोप्या शब्दांत सांगतात.

पुरुषसत्ताक व्यवस्थेवर त्यांनी ताशेरे ओढलेले आहेत, आणि यातून मुक्ती हवी असेल तर स्त्रिया, बहुजन समाज आणि शुद्र, अतिशूद्र यांना उपदेशही केलेला दिसतो. आणि त्यांनी केवळ उपदेशच केला, असे नाही, तर प्रत्यक्ष कृतीही केली. सावित्रीबाईंच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर शंकरपार्वतीचे चित्र रेखाटलेले आहे. यावरून त्या शिवाच्या भक्त होत्या असे वाटते. कारण त्यांच्या काव्यसंग्रहात शिवावर कविता दिसतात. याशिवाय त्यांना शिव आणि शक्ती या दोघांच्याही सारख्या योगदानाचे आकर्षण वाटले असावे, असे वाटते. या दोघांच्या एकत्र येण्यामुळे ज्याप्रमाणे मोठी मोठी कार्ये सिद्धीस गेली, त्याचप्रमाणे ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्त्याने



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal. Shirur, Dist. Pune

समान पातळीवर एकत्र येऊन करत असलेल्या कार्याला अधिक चांगले यश येईल, असा प्रतिकात्मक अर्थही त्यातून प्रकट होत असावा, असे वाटते. दुसरी गोष्ट महात्मा फुले हे नास्तिक नव्हते. फक्त त्यांच्या धर्माविषयी, देवदेवतांविषयीच्या कल्पना वेगळ्या होत्या. ते ईश्वराला निर्मिक म्हणतात. शिव ही भारतातील आदिम देवता मानली जाते. म. फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचाराप्रमाणे शूद्र हे या देशातील आदिम रहिवाशी आहेत. ज्यांना बाहेरून आलेल्या आर्यांनी म्हणजेच ब्राह्मणांनी गुलाम केले. असे त्यांच्या शूद्र शब्दाचा 'अर्थ' या कवितेवरून स्पष्ट होते. म्हणूनच शंकर-पार्वती या देवतांबद्दल त्यांना आकर्षण वाटत असावे, असे वाटते. आपल्या कवितांमध्ये त्यांनी शिवप्रार्थना, शिवस्तोत्र, ईशस्तवन इ. काव्ये ही शिवावर रचलेली दिसतात. मात्र या काव्यांमध्ये शिवाच्या रूपाचे व गुणांचे वर्णन करत असताना त्यांनी या देशातील गोरगरिबांना, बहुजनांना, स्त्रिया व शूद्र यांना ज्ञानप्राप्ती होऊन ते अंधःकरातून बाहेर पडू दे, अशी प्रार्थना करतात. उदा. 'शिवप्रार्थना' या काव्यात त्या शिवाकडे पुढीलप्रमाणे मागणी करतात,

अज्ञानीस जान देणे पूर्ण। चतुर्भद्राची स्वयंभू खूण।।३।।
करी व्याघ्रांवर वेस्टण।। ऐसे अभिरूप शिवावे ।।४।।
नमस्कार तुज शिवप्रभो।। आदि निर्मिक स्वयंभुविभो।।
अज्ञान नष्ट कारी, वर सर्वा लाभो।। प्रार्थना ही सावित्रीची ।।५।।

तसेच 'ईशस्तवन' या काव्यातही त्या म्हणतात,

नमन तुला शंकरा। श्रीघरा ।।धृ।।
नीलकंठ शिवशंभू सदाशिव,
तुजिया चरणी आमचा भाव अज्ञानी लेकरा उद्धरा।
आम्ही लेकरे तुला प्रार्थितो विद्या देई ज्ञान इच्छितो
दैन्यासूर संहारा। श्रीधरा।।

वरील काव्य ओळींमधून त्या शिवाकडे लोकांचे अज्ञान नष्ट करण्याचे तसेच उन्मत्त झालेल्या, ज्यांनी अनेक वर्षे येथील बहुजन समाजाला ज्ञानापासून वंचीत ठेवले, अशा सत्ताधारी वर्गाला लगाम घालावे, तसेच बहुजन समाजाला ज्ञान प्राप्ती करण्यास उद्युक्त करावे व त्यांच्या जीवनातून आज्ञानाचा राक्षक दूर व्हावा, अशी प्रार्थना करतात.

सावित्रीबाईंची जशी शिवावर श्रद्धा आहे तशीच ती आपल्या पतीवरही आहे. मात्र ही श्रद्धा 'पतीपरमेश्वर' या आंधळ्या भूमिकेतून आलेली नाही, तर म.फुले यांनी केलेल्या अफाट अशा समाजकार्यातून व त्यांनी आपल्या पत्नीला आपली सखी, सहचारिणी या भूमिकेतून दिलेल्या समानतेच्या वागणुकीतून आलेली दिसते. सावित्रीबाईंचा जेव्हा म. फुले यांच्याबरोबर विवाह झाला, तेव्हा त्यांचे वय केवळ नऊ वर्षांचे होते. त्या काळाप्रमाणे त्यांचा विवाह बालपणीच झाला. मात्र म.फुले यांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले आणि त्यांना स्वयंपूर्ण बनविले. आपल्या पतीचे इतरांपेक्षा वेगळे असलेले विचार, स्त्री-शूद्र यांच्यासाठी त्यांनी चालविलेले कार्य, सावित्रीबाईंना दिलेली समानतेची वर्तणूक या सर्वांचाच परिणाम त्यांच्या पतीविषयी वाटणाऱ्या आदरात दिसतो. म.फुले हे काही केवळ सावित्रीबाईंचे पतीच नव्हते, तर ते त्यांचे गुरुही होते. या संदर्भानेसुद्धा त्या म.फुले यांना वंदन करतात. 'जोतिबांचा बोध' व 'जोतिबांना नमस्कार', 'संसाराची वाट' या कविता त्यांनी म.फुले व त्यांचे समाजकार्य यांसंबंधी केल्या आहेत. 'जोतिबांचा बोध' या कवितेमध्ये सावित्रीबाई म्हणतात,

स्वामी जोतीबांच्या। लागे मी चरणी त्यांची गोड वाणी।
मनी घुमे महार मांगांची। करते मी सेवा आवडीच्या देवा। स्मरूनिया.
ऐसा बोध देती। अनुभवे जोती मनात ठेविती। सावित्री मी.'

याठिकाणी 'स्वामी जोतीबांच्या। लागे मी चरणी' असे जरी त्या म्हणत असल्या तरी ते गुरु-शिष्य या भावनेतून म्हटलेले असावे, असे दिसते.

तर 'जोतिबांना नमस्कार' या कवितेमध्ये सावित्रीबाई म्हणतात,

जोतिबांना नमस्कार।
मनोभावे करतसे ज्ञानामृत आम्हां देई। अशा जीवन देतेस।
थोर जोति दीन शूद्रा।
अतिशूद्रा हाक मारी ज्ञान ही ईर्षा देई। तो आम्हाला उद्धरी।

'संसाराची वाट' या कवितेमधूनही ज्योतीबांसारखा पती लाभलेला सखा, सोबती व त्यातून मिळणारा आनंद त्या व्यक्त करतात.

महाराष्ट्रात १९ व्या शतकात प्रबोधनाला सुरुवात झाली. त्यातून धर्मचिकित्सा, सामाजिक रितीरिवाज, यांविषयी चिकित्सा सुरू झाली व त्यासंबंधी मोठ्या प्रमाणावर लेखनही केले जाऊ लागले. अर्थात असे लेखनही समाजाला त्या काळात पटणे अतिशय कठिण होते. त्यामुळे अनेक सुधारक विचारवंताना आपले विचार मांडणे अवघड जात होते. अनेकांनी सामाजातून आपल्याला बहिष्कृत करू नये, म्हणून काही प्रायश्चित्तेही घेतलेली दिसतात. आपण व्यक्त केलेला विचार प्रत्यक्ष आचरणात आणणे काही मर्यादांमुळे काही सुधारकांना जमू शकले नाही. याच पार्श्वभूमीवर फुले दांपत्यांनी केवळ विचार मांडलेच नाही, तर ते कृतीतही उतरवले. त्यासाठी त्यांना स्वतःच्या घरातूनच बाहेर पडावे



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

ISSN No. 2394-5990

लागले, बहिष्कृत केले गेले. समाजाकडून शिव्याशापच ऐकावे लागले, असे नाही तर शेण चिखलाचा माराही सहन करावा लागला, त्यांच्यावर हल्लेखोर पाठविले गेले. मात्र या कोणत्याही गोष्टीला न डगमगता, या दांपत्याने आपले कार्य अधिक जोमाने पुढे चालू ठेवले. समाज सुधारणांत केवळ विचार व्यक्त करणे आणि कृती करणे यांतील फरक सावित्रीबाईंना चांगलाच माहीत होता आणि त्या कृतीला अत्यंत महत्त्व देत होत्या, हे त्यांच्या पुढील काव्यातून दिसते. सावित्रीबाई लिहितात,

वाचे उच्चारी। तैसी क्रिया करी, तीच नरनारी। पूजनीय।।
सेवा परमार्थपाळी व्रत सार्थ, होई कृतार्थ तेच वंद्य।।
सुख दुःख काही।स्वार्थपणा नाही, परहित पाही। तीच था।।
शास्त्राचे नाते। ओळखती जे ते, सावित्री वदते। तेच संत।। पृ.८.

या कवितेमधून सावित्रीबाईंचा दृष्टीकोन स्पष्ट आणि अत्याधुनिक दिसतो. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या म्हणीप्रमाणे केवळ बोलके सुधारक असण्यापेक्षा कृतीयुक्त सुधारक होणे, तसेच उच्च-नीच भेदभाव न करता, सर्वांना माणूस म्हणून जगण्याची संधी देणे हा मानवतावादी दृष्टीकोन त्यांना अतिशय महत्त्वाचा वाटतो. आणि कोणताही स्वार्थ न पाहता परहित जपणे अशा व्यक्तीला त्या संतांच्या ठिकाणी ठेवतात.

म. फुले यांनी १८४८ साली पुण्यात काढलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेत पहिल्या महिला शिक्षिका म्हणून त्या रुजू झाल्या. तेव्हा मुलींची संख्या जरी हातावर मोजण्याएवढीच असली, तरी ही सुरुवात करताना त्यांना झालेला अत्यानंद त्यांच्या आपल्या 'स्वागतपर पद्य' या कवितेमधून दिसतो. सावित्रीबाई या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, पहिल्या मुख्याधीपिका व पहिल्या समाजसेविका होत्या. सावित्रीबाईंनी अनेक निसर्ग कविताही केल्या. ज्यामध्ये अतिशय हळूवार भाव व्यक्त केले आहेत. मात्र तेथेही त्यांची सामाजिक जाणीव जागृत असल्याचे दिसते. त्यांनी 'जाईचे फुल', 'मानव व सृष्टी', 'पिवळा चाफा, 'जाईची कळी', 'गुलाबाचे फुल', 'फुलपाखरू व फुलाची कळी', 'बह्यवंती शेती', 'मातीची ओवी' यांसारख्या अनेक निसर्ग कविता रचल्या आहेत. त्यातील 'फुलपाखरू' व 'फुलाची कळी' या कवितेमध्ये नर-मादी यांच्या भावनिकतेची त्यांनी अगदी हळूवार शैलीत गुंफण केली आहे. मात्र येथेही त्यांचा स्रीवादी विचार अगदी परखड भावनेत व्यक्त झाले आहेत. यात त्या म्हणतात,

नकोसे केले तिजला त्याने, शोषून काढी मध तियेचा
चिपाड केले तिला तयाने ।।३।।
चव घेऊनि करी दूर ती
तीजकडे ते जरा न पाही, तिला टाकुनी दुसरीकडे
जावयास त्या लाजही नाही, कोण कोठली कळी फुलांची
जुनी विसर नवीन पाही, रीत जगाची उच्छृंखल ही
पाहुनिया मी स्तिमित होई ।।४।। .

या कवितेत निसर्गाचे देखणेपण टिपताना सावित्रीबाईंनी भारतातील तत्कालीन समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेवर व स्त्रियांच्या दुय्यम, दुर्बल अवस्थेवर अतिशय गंभीर प्रहार केलेले दिसतात. समाजातील जळजळीत वास्तव त्यात रेखाटलेले दिसते. पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या दयनीय अवस्थेवर त्या बोट ठेवतात. स्त्री ही माणूस असून पुरुषांप्रमाणे तिला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हे केवळ उक्तीनेच नव्हे तर कृतीने सांगणारी ती पहिली भारतीय स्त्री होय. स्त्री-पुरुष समानतेचा पहिला जाहीरनामा सावित्रीबाईंचा आहे. असे म. गो. माळी म्हणतात. ज्या काळात स्त्रीवाद ही संकल्पना फारशी अस्तित्वातही नव्हती, तेव्हा त्यांनी या विषयावर केलेला जोरदार प्रहार नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. यामध्ये सावित्रीबाईंच्या जाणीवा व धाडस किती प्रखर होते, हे दिसते.

'जाईचे फुल' या निसर्ग कवितेतही त्यांच्या या जाणीवा प्रकट झालेल्या दिसतात. त्या म्हणतात,

' कार्य झाल्यावर फेकून देई, मजला हुंगून '

स्त्रीवादाबरोबरच समाजमनाच्याच्या क्रौयावरही त्यांनी बोट ठेवले आहे. आणि त्याचवेळी ब्राह्मण विधवा स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय दूर करण्यासाठी १८६३ 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना करून अन्याय झालेल्या, अडलेल्या अनेक स्त्रियांची बाळंतपणे केली.

सावीत्रीबाईंनी आपल्या कवितांमधून शुद्राती शूद्रांच्या दैन्य आणि दुःख यांना वाचा फोडली आहे, तसेच मनुस्मृती सारख्या ग्रंथावरही टीकास्त्र सोडले आहे. बहुजनांना जर प्रगती करावयाची असेल, मुख्य प्रवाहात स्थान मिळवायचे असेल, तर शिक्षणाचे व त्यातही इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व वारंवार त्यांच्या कवितांमध्ये दिसते. त्यांनी 'शूद्रांचे दुखणे', 'मनू म्हणे', 'शिकणेसाठी जागे व्हा', 'इंग्रजी माऊली', 'श्रेष्ठ धन', 'शूद्रांचे परावलंबन', 'सामुदायिक संवाद पद्य', 'अज्ञान', 'सावित्री व जोतीबा संवाद', 'शुद्र शब्दाचा अर्थ' यासारख्या कवितांमधून आपली तळमळ व्यक्त केली आहे. 'शुद्रांचे दुखणे' या काव्यात त्या म्हणतात,



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune

दोन हजार वर्षांचे। शूद्रा दुखणे लागले
ब्रह्मविहित सेवेचे। भू-देवांनी पछाडले
अवस्था पाहुनि त्यांची होय शब्दी मन उठे
सुलभ मार्ग कोणता काय विचारे बुद्धि अटे
शूद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हाटते पहा।।

या काव्यात भारतात हजारो वर्षांपासून चालत आलेल्या वाईट रूढी परंपरांचे विश्लेषण सावित्रीबाई करतात. ब्राह्मणांची सेवा हेच शुद्रांचे कार्य होऊन बसले होते. शूद्रांना समाजात मिळणारी सापत्न वागणूक जर दूर करायची असेल, तर त्यावर एकच महत्त्वाचा उपाय आहे व तो आहे शिक्षण घेणे, असे त्या सुचवितात. शिक्षण घेतल्यामुळे मानवता, मनुष्यत्व, माणुसकी निर्माण होते व मानवामध्ये निर्माण झालेले पशुत्व नष्ट होण्यास मदत होते. हे अगदी साध्या शब्दांत त्यांनी सांगितले आहे. याच धाग्याला धरून 'मनु म्हणे' या काव्यात त्या म्हणतात,

नांगर धरती। शेती जे करती।
मठ्ठ ते असती। मनु म्हणे ।।१।।
......शूद्र जन्म घेती। पूर्वीची पापे ती।।
जन्मी या फेडती। शूद्र सारे ।।३।।
विषम रचती। समाजाची रीती।।
धूर्ताची ही नीती। अमानव ।।४।।

येथे सावित्रीबाईंनी मनुस्मृतीतील विषमता अगदी साध्या, सोप्या, मोजक्या शब्दांत व्यक्त केली आहे. भारतीय धर्मव्यवस्थेत पुनर्जन्माची कल्पना आहे व पुढील जन्म मागील जन्मातील पापपुण्यावर आधारित असतो, ही जी मानसिकता रुजविलेली आहे, त्यावर त्या प्रहार करतात. पूर्वजन्माच्या पापाची शिक्षा म्हणून या जन्मात त्यांना शूद्रांचा जन्म मिळाला, असे त्यांच्या मनावर सातत्याने बिंबविल्यामुळे हेच खरे आहे, असे शुद्र समजू लागतात. म्हणजे गुलामगिरी त्यांच्या मानसिकतेचाच एक भाग बनली आहे. त्यांना आपण गुलाम आहोत, याचीच जाणीव नाही. आधी त्यांना त्याची जाणीव करून देणे हे सावित्रीबाईंना गरजेचे वाटते. त्यांना ही जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांना शिक्षण घेणे प्रथम गरजेचे आहे. शिक्षणाची जाणीवही त्यांना करून देण्यासाठी त्या प्रयत्न करतात. अशी मानसिकता निर्माण करणाऱ्या धूर्त लोकांची त्यांना प्रचंड चीड येते, असे दिसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी याच विषम व्यवस्थेच्या रचनेमुळे मनुस्मृती या ग्रंथाचे १९२७ साली महाड येथे दहन केले होते. मात्र याच 'मनुस्मृती' या ग्रंथाचे स्वरूप सावित्रीबाईंनी १८५४ सालीच स्पष्ट केले होते,असे दिसते.

'शूद्र शब्दाचा अर्थ' या काव्यात सावित्रीबाईंनी शूद्र या शब्दाचा अर्थ 'नेटिव्ह' म्हणजे 'एतद्देशिय' असा लावला आहे. म्हणजे तत्कालीन शुद्र हेच खरे या देशाचे पूर्वज असून ब्राह्मण, इराणी, यवन, हूण हे सर्वच परकीय आहेत, अशी मांडणी त्या करतात. व 'बळीचे स्तोत्र' या कवितेमध्ये त्या बळीराजा म्हणजे शेतकरी यांचे महत्त्व पटवून देतात.

'इंग्रजी शिका' व 'इंग्रजी माऊली' या कवितांमध्ये इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व सावित्रीबाईंनी स्पष्ट केलेले दिसते. 'इंग्रजी शिका' या कवितेमध्ये त्या म्हणतात,

स्वावलंबनाचा। उद्योग प्रपंच ज्ञान धन संच करी यले ।।
विद्येविण गेले। वाया गेले पशु स्वस्थ नका बसू। विद्या घेणे ।।
शूद्र अतिशूद्र। दुःख निवाराया इंग्रजी शिकाया। संधि आली ।।
इंग्रजी शिकूनि। जातीभेद मोडा भटजी भारूडा फेकुनिया ।।

पुढे 'इंग्रजी माऊली' या कवितेमध्ये त्या म्हणतात,

पेशवाई गेली।। इंग्रजी माऊली आली ।।.....
दूर फेकुनि रूढी द्या रे परंपरेची मोडुनि दारे
लिहीणे वाचणे शिकून घ्यारे छान वेळ आली
...इंग्रजी माऊली आली।।
भटधर्माच्या क्लृप्त्या नाना अज्ञानामुळे शूद्रजनांना
पिळती छळती बहु तयांना देश इंडिया नाही कुणाचा
इराणी बहान यवन हुणांचा असा खरा तो इंडि रक्ताचा
ठोक रे आरोळी....इंग्रजी माऊली आली ।।

वरील कवितांमधून बहुजनांना त्या ज्ञान मिळविण्यासाठी प्रवृत्त तर करतातच, पण त्याचबरोबर जगाची ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचेही महत्त्व सांगतात. त्याचबरोबर येथील लोकांची 'दे रे हरी, खटल्यावरी' या वृत्तीचाही समाचार घेतात. इंग्रजांप्रमाणे येथील बहुजनांनी विविध कार्ये करून स्वतःला सिद्ध केले पहिले. यातच त्यांचा व देशाचा विकास आहे, हेही पटवून देतात. तसेच इंग्रजांचा उल्लेख त्या माऊली' असा करत आहेत. याचा अर्थ इंग्रजांची गुलामगिरी त्यांना मान्य आहे, असा होत नाही. मुळात येथील कनिष्ट वर्ग हा आधीपासूनच वरिष्ठ वर्गाचा गुलाम आहे. भारतात १९व्या शतकात इंग्रजविरोधी चळवळ उभी राहिली. मात्र त्याचवेळी भारतात अंतर्गतही अनेक चळवळी सुरु झाल्या होत्या. ज्या सोशित समाजाने शोषक समाजाविरुद्ध सुरु केल्या होत्या. त्यातीलच एक चळवळ स्त्री, शूद्रांची होती. अनेक वर्षे या घटकांना ज्ञानापासून वंचित रहावे लागले होते. त्याचमुळे त्यांना अनेक संधींपासूनही मुकावे लागले होते.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

ISSN No. 2394-5990

इंग्रजांच्या राजवटीमुळे काही प्रमाणात या वर्गाला शिक्षणाची कवाडे खुली झाली होती. ही संधी सावित्रीबाईंना अत्यंत महत्त्वाची वाटत होती. म्हणून त्या इंग्रजांचा उल्लेख माऊली' असे करतात. कारण इंग्रजांविरुद्ध सुरु झालेला स्वातंत्र्यलढा जरी जिंकला असता, तरी नक्की स्वातंत्र्य कोणाला मिळणार, हा प्रश्न होताच. पुन्हा एकदा येथील बहुजन समाज वरिष्ठ वर्गाचाच गुलाम होणार, अशी भीती सावित्रीबाईंना वाटत होती. म्हणून कनिष्ट वर्गाला हजारो वर्षांच्या दास्यातून मुक्त होण्याची ही सुवर्णसंधी आहे, असे त्यांना वाटणे सहाजिकच आहे. याचा अर्थ त्या देशद्रोही होत्या, असा होत नसून, सर्वांचीच मुक्ती व्हावी, असे त्यांना वाटत होते. राजकीय स्वातंत्र्य तर केव्हातरी मिळणारच आहे, मात्र तत्पूर्वी सामाजिक स्वातंत्र्य मिळणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटत होते, असे वाटते.

सावित्रीबाई फुले यांना महाराष्ट्रातील ऐतिहासिक विभूतींबद्दल अतिशय आदर वाटत होता. त्यांच्या काव्यसंग्रहात छ.शिवाजी महाराज व महाराणी ताराबाई यांच्या पराक्रमाचे वर्णन आले आहे. छत्रपती शिवाजी या कवितेत शूद्रादि अतिशूद्रांचा प्रभू म्हणून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. हा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख लक्षात घेण्यासारखा आहे. छत्रपतींनी आपले राज्य उभे करत असताना सर्व जातीधर्मांच्या लोकांना सामाऊन घेतले होते. तसेच राज्यात देखील सर्वांना त्यांच्या गुणांनुसार संधी दिली होती. त्यांचे राज्य हे न्यायाचे व लोककल्याणकारी राज्य होते. म्हणून त्यांना महाराजांविषयी अत्यंत आदर दिसतो. तर दुसरीकडे राणी छत्रपती ताराबाई' यांवरील काव्यात अगदी थोड्या सैन्याच्या आधारे सर्वात मोठ्या मोगल साम्राज्याविरुद्ध त्यांनी दिलेला लढा व त्यामध्ये मिळविलेला विजय हा सावित्रीबाई यांना फार महत्त्वाचा वाटतो. कारण स्त्रियासुद्धा कोणत्याही क्षेत्रात संधी मिळाली तर त्या संधीचे सोने करून दाखवतात, हेच त्यांना प्रचंड भावलेले दिसते. याठिकाणी सावित्रीबाई फुले यांनी महाराणी ताराबाई यांची तुलना कोल्हापूरची जगदंबा, महाराष्ट्राची अंबाई, भवानी, असुरमर्दिनी, रणदेवाई, चंडीका या देवींबरोबर केली आहे.

'श्रेष्ठ धन' या काव्यातुनही विद्या हेच खरे सर्व श्रेष्ठ धन आहे, हे त्या सांगतात. तर 'बाळास उपदेश' या काव्याच्या माध्यमातून त्यांनी कामाचे महत्त्व त्यांनी सांगितले आहे. कोणतेही काम पुढे न ढकलता उलट जितक्या लवकर करता येईल, तितक्या लवकर करण्याचा उपदेश त्या करतात. कार्यसंस्कृतीला त्या अत्यंत महत्त्व देत होत्या, असे दिसते. मानव व सृष्टी यांचे अत्यंत अतूट नाते हेही त्यांच्या कवितेतून दिसते. या कवितेतून त्यांचा मानवतेचा विचार स्पष्टपणे दिसतो. याचा प्रत्यय त्यांच्या संपर्कात आलेल्या काही लोकांनी ज्या आठवणी लिहिलेल्या आहेत, त्यामध्ये दिसतो. त्यांचे वर्णन करताना महादू सहादू वाघोले यांनी नमूद केले आहे की. ती अतिसज्जन बाई होती. तिचे अंतःकरण दयेने भरलेले होते. गोरगरिबांवर ती फार दया करी व अन्नदान पण फार करी. ती फारच उदार होती. ती कोणासही जेवू घाली... याच पुस्तकात ग्यानोबा कृष्णाजी ससाणे म्हणतात, 'तात्यांपेक्षा काकूचा स्वभाव फारच ममताळू होता. मला त्या आईप्रमाणे पूज्य वाटत होत्या, त्यांच्या मानवतेची अनेक उदाहरणे त्यांच्या कृतीतून दिसत. सावित्रीबाईच्या मनात कोणत्याही प्रकारच्या अंधश्रध्येला स्थान नव्हते.'

हे त्यांच्या कवितेतून व इतर लेखनातूनही दिसते. आपल्या 'नवस' या कवितेत त्या म्हणतात,

गोट्याला शेंदूर । फासुनि तेलात वसती देवात। दगड तो ।।
म्हसोबा खेसोबा। भयंकर देव तयावर भाग। ठेवोनिया ।।
नवस करिती। बकरू मारीन नवस फेडीन। बाळजन्मी ।।
धोंडे मुले देती। नवसा पावती लग्न का करती। नारी नर ।।
सावित्री वदते। करूनि विचार जीवन साकार करूनि घ्या ।।

सावित्रीबाईंची सर्वात महत्त्वाची कविता म्हणजे 'तयास मानव म्हणावे का?' ही आहे या कवितेच्या आशयामध्ये त्यांनी मानवतावाद, ज्ञानाचे महत्त्व, थोडक्यात संतुष्ट होण्याची वृत्ती म्हणजेच आळशीपणा, कार्यसंस्कृतिचे महत्त्व, स्वर्ग-नरक यासारख्या खुळचट कल्पनांना विरोध, गुलामगिरीचे जोखड, जगण्याविषयी नसलेली जाणीव, पशुंसारखे जीवन व्यतीत करताना त्याविषयी काहीच वाईट न वाटणे आणि एकंदरीतच जगण्यातील उदासीनता या सर्वांविषयी वाटणारी खंत त्या व्यक्त करतात.

ज्ञान नाही विद्या नाही, तेणे गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही, तयास मानव म्हणावे का? ।।१।।
दे रे हरी पलंगी काही ,पशूही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही, तयास मानव म्हणावे का? ।।२।।
पोरे घरात कमी नाहीत, तयांच्या खाण्यासाठीही
ना करी तो उद्योग काही, तयास मानव म्हणावे का? ।।३।।
सहानुभूती मिळत नाही, मदत न मिळे कोणीचीही
पर्वा न करी कशाचीही, तयास मानव म्हणावे का ? ।। ४ ।।
जोतिष रम सामुद्रिक हो, स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही, तयास मानव म्हणावे का ? ।। ५।।



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune

बाईल काम करीत राही, ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही...तयास मानव म्हणावे का? ॥ ६॥
संसारी दारिद्र्य राही, पांघरून तयावर नाही
निंदिती सगळे लोकही, तयास मानव म्हणावे का? ॥७॥
लिहीणे वाचणेही नाही, उपदेश पटायचा नाही
पशूंना कळे ते न कळेही, तयास मानव म्हणावे का? ॥८॥
पशुत्वाची लज्जा नाही, पशुजीवाची लक्षणे ही
त्यालाच मानीतो सुखही, तयास मानव म्हणावे का? ॥९॥
दुसऱ्यास मदत नाही, सेवा त्याग दया माया ही
जयापाशी सगुण नाही, तयासा मानव म्हणावे का? ॥१०॥
गुलामगिरीचे दुःख नाही, जराही त्यास जाणवत नाही
माणुसकीही समजत नाही, तयास मानव म्हणावे का? ॥११॥
पशुपक्षी माकड माणुसही, जन्ममृत्यू सर्वांनाही
याचे ज्ञान जराही नाही, तयास मानव म्हणावे का?॥१२॥

सावित्रीबाई फुले यांच्या वरील कवितेत तर त्यांच्या संपूर्ण विचारांचे, कृतीचे आणि एकूणच आयुष्याच्या संपूर्ण वाटचालीचे तत्त्वज्ञान सामावले आहे. एकूणच या काव्यसंग्रहामधून त्यांचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. त्यांचे संपूर्ण जीवन हे समाजकार्यासाठी त्यांनी व्यतीत केले. त्यांच्या काव्यांमधून त्यांनी जसे कृतीला महत्त्व दिले आहे, त्याप्रमाणे त्यांनी त्याचेच पालनही केलेले दिसते. आपल्या पतीच्या बरोबरीने स्त्री-शूद्र यांच्या उद्धारासाठी संपूर्ण आयुष्य त्यांनी पणाला लावले आणि या साध्वीचा मृत्यूही समाजकार्य करतानाच झाला. 'काव्यफुले' या संपूर्ण काव्यसंग्रहातील त्यांच्या कविता अत्यंत तळमळीने लिहिलेल्या आहेत. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या इतर साहित्यामध्येही त्यांची ही तळमळ प्रकर्षाने जाणवते, जी १९ व्या शतकातच नव्हे तर आज २१ व्या शतकातही तेवढीच क्रांतिकारी आणि महत्त्वाची वाटते. १९व्या शतकात आपल्या पतीच्या मृत्युनंतर स्वतः हातात टिटवे घेऊन त्यांच्या देहाला अग्नी देण्याचे त्यांनी केलेले धाडस आजही २१ व्या शतकात अगदी हाताच्या बोटावर मोजण्याएवढ्याच अपवादात्मक स्त्रियांनी केलेले किंवा करताना दिसतात. यातूनच सावित्रीबाई या काळाच्या किती पुढे होत्या, याची आपण फक्त कल्पनाच करू शकतो.

**संदर्भग्रंथ :**


१) ऐतिहासिक विभूती, महान व्यक्ती यांविषयी एकेरी उल्लेखांवरून अलीकडे वाद उद्भवतात. मात्र या ठिकाणी लेखनाच्या सोयीसाठी काही ठिकाणी असे उल्लेख आले आहेत. परंतु त्यामध्ये कोणत्याही ऐतिहासिक, सन्माननीय व्यक्ती, विभूती, यांचा अवमान करण्याचा सदर संशोधकांचा कोणताही हेतू नाही. या सन्माननीय व्यक्तींबद्दल सदर संशोधकला पूर्ण आदर आहे.
२) संपा. डॉ. मा.गो. माळी, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, चतुर्थ आवृत्ती, ऑक्टों. २००६. प्रस्ता. पृ. सतरा.
३) कित्ता, प्रस्ता., पृ. सतरा.
४) कित्ता, प्रस्ता. पृ. वीस. एकवीस
५) कित्ता, प्रस्ता. पृ. अठरा
६) कित्ता, पृ. १३१ ते १४०.
७) जी. ए. उगले, सावित्रीबाई फुले, साकेत प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, पृ. ५७.
८) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ. २२
९) कित्ता, पृ. ३.
१०) कित्ता, पृ. ७.
११) कित्ता. पृ.६,७.
१२) धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, सहावे पुनर्मुद्रण,२०२१, पृ. ३०.
१३) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, कित्ता.पृ. ५
१४) संपा. मा.गो. माळी व इतर, सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८. पृ. ३१.
१५) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ.१६
पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व, पृ.३७.
१६) कित्ता, पृ. ७.
१७) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले, पृ.१८.
१८) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ. १७.
१९) कित्ता, पृ. १९
२०) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी पुनरावृत्ती, १४ एप्रिल २०१६, पृ. ११५.
२१) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ.१९.
२२) कित्ता, पृ. ३०
२३) कित्ता, पृ २३.
२४) कित्ता, पृ. २१,२२
२५) कित्ता, पृ. ५.
२६) कित्ता, पृ. ९
२७) कित्ता, पृ. ९ व १०.
२८) कित्ता, पृ.२०




SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

ISSN No. 2394-5990

२९) कित्ता, पृ.२१
३०) कित्ता, पृ. १७
३१) संपा. हरी नरके, आम्ही पाहिलेले फुले, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई, १९९३, पृ. ८१.
३२) कित्ता, पृ. ८५.
३३) पूर्वोक्त, सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, पृ.२२
३४) कित्ता, पृ. २७, २८.

●●●

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur. Dist.Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403